# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 12 मे 1991
**स्थळ** : महाराष्ट्र हायस्कूल, डिलाईल रोड, मुंबई – 400 013.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. | 13. |
| 2. | 14. |
| 3. | 15. |
| 4. | 16. |
| 5. | 17. |
| 6. | 18. |
| 7. | 19. |
| 8. | 20. |
| 9. | 21. |
| 10. | 22. |
| 11. | 23. |
| 12. | 24. |

फळसेवाडी परस्पर हितकारी संस्था, मुंबई हिची सर्वसाधारण सभा दिनांक 12 मे 1991 रोजी महाराष्ट्र हायस्कूल, डिलाईल रोड, मुंबई – 400 013 येथे संप्पन्न झाली. याप्रसंगी प्रथम संस्थेच्या चिटणीसांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत केले व ज्या सभासदांना निमंत्रण पोहोचले नसेल त्याबद्दल दिलगीरी व्यक्त केली. या सभेस 24 सभासद उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे हे गावी गेल्यामुळे उपाध्यक्ष श्री रामकृष्ण भगवान राणे हे अध्यक्ष स्थानी स्थानापन्न झाल्यावर हे सभा सुरू झाली. चिटणीसांनी कार्यक्रम पत्रिका वाचून दाखविली. त्यानंतर दिनांक 12 एप्रिल 1991 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले व हे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

सन 1988 ते 1990 पर्यंतचा जमाखर्च (हिशेब) खजिनदार यांनी वाचून दाखविल्यानंतर तो सर्वानुमते मंजूर केला. याला अनुसरुन श्री विठोबा साबाजी साटम यांनी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाबद्दल चर्चा होऊन त्यांना पत्र पाठविण्याचे ठरले.

अंर्तगत लेखापरिक्षक म्हणून श्री प्रशांत काशिनाथ राणे व श्री अविनाश बाळकृष्ण राणे यांची सर्वानुमते वर्ष 1991 ते 1993 सालासाठी निवड केली.

दिनांक 12 मे 1991 पर्यंत 30 सभासद फार्मस भरुन झाले. वार्षिक वर्गणीपोटी रु.661/- जमा झाले व स्नेहसंमेलन रु.1100/- जमा झाले.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(07 to 09)

यानंतर मुंबई सोडून गावी गलेल्या सभासदांबद्दल व त्यांच्या बाकी वर्गणीबद्दल चर्चा झाली. असे सभासद खालील प्रमाणे –

1) श्री विठोबा साबाजी साटम – वर्गणी रु. 118/- व कर्ज रु.115/-
2) श्री निळकंठ नारायण राणे
3) श्री दिनकर स राणे
4) श्री बालशिवाजी राणे
5) श्री अशोक र राणे.

यावर श्री अविनाश कृष्णाजी राणे यांची अशी सूचना आली की या सर्व सन्माननीय संस्थेने पत्र पाठवून वर्गणीची आठवण करून देणे. यापैकी श्री दिनकर स राणे यांची सर्व वर्गणी पोहोचती झाली (दिनांक 12 मे 1991). तसेच इतर सभासद वर्गणी बाकी असलेल्या सभासदांची लिष्ट कार्यकारीणी सदस्यांकडे सूपूर्द करावी असे ठरले.

श्री श्रीधर आ राणे (माजी खजिनदार) यांनी त्याच्याकडे असलेले (कॅश एन हॅन्ड) रु. 525.35 संस्थेस परत केले.

अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयामध्ये वाडीतील नियोजित विहीरीच्या कामकाजाबद्दल चर्चा झाली. चिटणीसांनी अशी माहीती दिली की पूर्वी ठरल्याप्रमाणे संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे हे विहीरीच्या बांधकामाच्या पुढील प्रगतीबद्दल पत्र पाठविणारा होते परंतू ते गावाहुन न आल्यामुळे पुढील जास्तीची माहीती मिळू शकत नाही. तत्पूर्वी विहीरीच्या जागेसाठी श्री वामन श्रीधर रावराणे यांच्यामार्फत श्री उदय भगवान राणे यांचे रु.5 च्या स्टॅम्पपेपरवर जागेची ना हरकत परवानगी दिली आहे व आपणाला कोणत्याही परीस्थितीत नवीन विहिर बांधण्याचे ठरले व पुढील प्रगति पत्रकाव्दारे कळविण्याचे ठरले. जमा झालेले पैसे फिक्स डिपॉझिट मध्ये भरण्याचे ठरले. यानंतर श्री लिंगेश्वर मंदीर मदतनिधीची 43 पुस्तके आली त्यापैकी सभासदांनी 9 पुस्तके सभासदांनी घेतली व बाकी पुस्तके परत करण्यात आली. संस्थेची कार्यकारीणीची सभा लवकरच घेण्याचे ठरले.

यानंतर चिटणीसांनी सर्व सभासद बंधूंचे सभेस वेळेवर उपस्थित राहिल्याबद्दल मन:पुर्वक आभार मानले. संस्थेच्या मिटींगसाठी महाराष्ट्र हायस्कूल, डिलाईल रोड यांनी वर्ग उपलब्ध करुन दिल्याबद्दल आभार मानले. तसेच श्री रमेश राणे यांनी या मिटींगचा चहापाण्याचा खर्च केला त्याबद्दल आभार मानले. यानंतर ही सभा 7:30 वाजता संपल्याचे घोषीत केले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
चिटणीस

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(07 to 09)